सोबत तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे **शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता परदेशी शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांकडून ऑन लाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्याचा कालावधी दिनांक २७.०७.२०२६ पर्यंत वाढविण्याबाबतचे परिपत्रक** क्रमांक १८/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२६/बी-१५/४१० दिनांक १६/०७/२०२६ सोबत जोडलेली आहे.कृपया त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

क्र.विकाअ/शिक्षण/परदेशी शिष्यवृत्ती /२०२६/ 1901
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दि. 17 JUL 2026

**प्रति,**

**प्राचार्य**, सर्व व्यावसायिक पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था अमरावती विभाग, अमरावती यांना सदर परिपत्रक विद्यार्थ्यांचे निर्देशनास आणण्यात यावे.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:** प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४२१/४७९
ई-मेल-foreignscholarship.desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १८/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२६/बी-९५/४९० दिनांक: - १६/७/२०२६

## परिपत्रक

सन २०२६-२७ परदेशी शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांकडून ऑन लाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्याचा कालावधी १५.०६.२०२६ ते १६.०७.२०२६ असा असून विभागीय कार्यालयांनी सदर अर्जाच्या अनुषंगाने कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठीचा कालावधी दिनांक १६.०६.२०२६ ते १७.०७.२०२६ असा या निश्चित करण्यात आलेला होता. या संदर्भाने तंत्र शिक्षण संचालनालयाकडून विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी दिनांक २३.०६.२०२६ रोजी वृत्तपत्रांमध्ये जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तंत्र शिक्षण संचालनालयाकडून दिनांक १५.०७.२०२६ रोजी सर्व विभागीय कार्यालयांकडून प्राप्त झालेला विद्यार्थ्यांच्या अर्जाची सांख्यिकी माहिती घेतली असता सन २०२६-२७ साठी परदेशी शिष्यवृत्तीकरीता विद्यार्थ्यांना ऑन लाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी दिनांक २७.०७.२०२६ पर्यंत कालावधी वाढविण्यात येत असून विभागीय कार्यालयांनी दिनांक २८.०७.२०२६ पर्यंत (सायंकाळी ५.०० वा. पर्यंत) सर्व अर्जाच्या अनुषंगाने कागदपत्रांची पडताळणी करावयाची असून तसा ऑन लाईन डाटा दिनांक २९.०७.२०२६ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यंत संचालनालयाकडे सादर करावयाचा आहे. ऑफ लाईन पध्दतीने स्वीकारण्यात आलेले विद्यार्थ्यांचे अर्ज या संचालनालयाकडे सादर करण्याबाबत पुढील निर्देश स्वतंत्रपणे कळविण्यात येतील.

आपला

(डॉ. प्रमोद नाईक)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये- मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर
२. सहसंचालक उच्च शिक्षण विभागीय कार्यालये - मुंबई/पनवेल/पुणे/कोल्हापूर/सोलापूर/जळगांव/छत्रपती संभाजीनगर /नांदेड/अमरावती/नागपूर